एप्रिल – २००६

# इन्कम टॅक्स आणि एन.पी.ए.

केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी एकाच वेळी पतसंस्थांना इन्कम टॅक्स आणि बँकांप्रमाणे पतसंस्थांना एन.पी.ए. लागू करण्यासंदर्भात सहकार खात्याच्या माध्यमातून जोरदार मोहिम आखलेली आहे.महाराष्ट्र राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या चळवळीत काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांनी व पतसंस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राज्यातील सर्व फेडरेशनने यासंदर्भात विरोध नोंदविण्याचे काम यापूर्वी त्या-त्या स्तरावर केलेले आहे.

पतसंस्थांना बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट लागू नसल्यामुळे नेगोशीएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट नुसार संस्थेचा आर्थिक व्यवहार धनादेशाच्या माध्यमातून करण्यास वाव नाही.अनेक पतसंस्थांच्या ठेवी व खेळते भांडवलाची क्षमता बघता त्यांना R.B.I. बँकिंग लायसन्स देण्याच्या सुद्धा मन:स्थितीत नाही.एका बाजूने बँकिंग प्रमाणे व्यवसाय करण्याची क्षमता असणाऱ्यांना देखील बँकिंग लायसन्स द्यायचे नाही व दुसऱ्या बाजूस मात्र राज्य सरकारच्या सहकार खात्याच्या माध्यमातून बँकांप्रमाणे एन.पी.ए. लागू करायचा.ही बाब अनाकलनीय आहे. व बँकांप्रमाणे पतसंस्थांना देखील ठेवीदारांच्या ठेवीवरील व्याजावर थेट टी.डी.एस.ची कपात करण्याचे बंधन लागू करणे व भविष्यात बँकांप्रमाणेच पतसंस्थांच्या नफ्यावर देखील 33.5 टक्के इन्कम टॅक्स लावणे, अशा पद्धतीने पतसंस्थांच्या चळवळीत आव्हानात्मक व भितीदायक वातावरण पसरलेले आहे.शिवाय यामुळे मागणी करणे, राज्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यासाठी विरोध करणे व R.B.I.ने मात्र आपली भूमिका जराही न बदलणे ही बाब त्याहीपेक्षा भयंकर आहे.

पतसंस्थांनी एन.पी.ए. ची तरतुद करणेसाठी त्यांना आणखी 3 वर्षांची मुदत वाढवून द्यावी ही मागणी राज्य सरकार मंजूरही करेल.परंतू एकाने द्यायचे व दुसऱ्याने लादलेले पुढे ढकलण्यासाठी प्रयत्न करावयाचे व कार्यकर्त्यांना लाचार व मेटाकुटीस आणायचे, हा सुद्धा खेळ बरोबर नाही.एन.पी.ए. ला मुदतवाढ ऐवजी ती पतसंस्थांना लागू करूच नये अशा प्रकारचे स्पष्ट धोरण मांडण्याची जबाबदारी सरकारची आहे.आणि हे जर होत नसेल तर नेहमी टांगती तलवार ठेऊन पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना सतत फरफटत ठेवून त्यांचेवर वेगळ्या पद्धतीने आपला अंकुश व दबाब ठेवण्याचे काम सहकारातल्या शहाण्या लोकांनी करू नये व सरकारने याप्रश्नी प्रथम किमान हा विचार करणे आवश्यक आहे.

इन्कम टॅक्सच्या बाबतीत सुद्धा हेच चित्र दिसत आहे.राज्य सरकारने बँकांच्या नफ्यावरील इन्कम टॅक्स आकारणीच्या धोरणास यापूर्वीच कडाडून विरोध केलेला आहे.त्यामुळे पतसंस्थांचा याबाबतीत समाविष्ट होण्याचा क्रमांक नंतर लागतो हेही लक्षात घेतले पाहिजे.अगोदर राजा अडचणीत आहे त्यामुळे राजाची अडचण दूर झाल्याशिवाय प्रजेला अडचणीत आणण्याचे धाडस होईल असे होऊ शकत नाही.आणि म्हणून इन्कम टॅक्सच्या संदर्भामध्ये पतसंस्थांच्यामधील कार्यकर्त्यांनी गांगारून जाण्याची बिलकुल आवश्यकता नाही.सहकारामध्ये नफ्यावर इन्कम टॅक्स ही संकल्पना हे राज्य पेलावू शकेल

अशी परिस्थिती असण्याचा प्रश्नच उदभवू शकत नाही. त्यामुळे पतसंस्थांसारख्या अतिसामान्य कार्यकर्त्यांनी उभ्या केलेल्या या चळवळीस उपकार कर्त्यांची गरज नाही.किंबहुना तसे संभवत नाही.थोडक्यात ज्याप्रमाणे रेल्वेचे प्रवासी भाडे जर एक रूपया वाढवायचे असेल तर दोन रूपयांची वाढ प्रथमच सुचवायची व तद्नंतर नेहमीप्रमाणे जनता आंदोलन करते,निषेध नोंदविते, एकत्रीत होते व तद्नंतर एक रूपया भाडेवाढ कमी करून घेतल्याच्या फुशारकीचा आनंद व एक रूपया भाडेवाढ शेवटी केलीच असा आसुरी आनंद माननाऱ्यांचे हे कारस्थान आहे, हे समजून घेतले पाहिजे.

एकंदरीत एन.पी.ए.चा किंवा इन्कम टॅक्सचा प्रश्न असो, पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांनी मुळ प्रश्न बाजूला ठेऊन आपला वेळ खर्च करू नये. राज्य व केंद्र सरकार ज्यांच्यामुळे आहे त्यांनाच मोडून काढण्याची मानसिकता ज्यांची ज्यांची व ज्या कारस्थानामुळे होत आहे, ती कुठलीही योजना मग ती कोणाचीही असो ती यशस्वी होणे शक्य नाही. म्हणून एन.पी.ए.आणि इन्कम टॅक्स याला कडाडून विरोध करून मुळ सहकार चळवळ कोणालाही फरफटत नेऊन चालविता येणार नाही.किंवा फसविता येणार नाही.हे नजिकच्या काळात संबंधितांच्या लक्षात येणारच आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**